International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
May 2014 Issue-II, Volume-II
Online Journal ISSN No. 2347-8268

# भारतातील आर्थिक विषमता/असमानता

# (Inequality in India)

प्रा. अनिल शिंदे[1] आणि डॉ. जे.एम. काकडे[2]
1 अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर.
2 समाजशास्त्र विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, बल्लारपुर, जि.चंद्रपूर.

## प्रस्तावना :

भारतीय नियोजनाच्या संदर्भात नेहमी एक प्रश्न उपस्थित केला जातो, तो म्हणजे भारताने नियोजनबध्द पध्दतीने विकासास सुरूवात केल्यापासून गरीब आणि श्रीमंत हयांच्यातील अंतर कमी झाले की वाढले आहे. या अनुषंगाने भारतात ज्या ज्या अभ्यासगटांनी, संस्थांनी आणि विद्वानांनी अध्ययन केलेले आहे. त्यांचा एकच निष्कर्ष आहे तो म्हणजे भारतात आजही गरीब आणि श्रीमंत हयांच्यातील अंतर म्हणजेच असमानता का वाढत आहे. या कारणांचा शोध घेण्यापूर्वी भारतात या असमानतेबाबत ज्या–ज्या अभ्यासगटांनी, संस्थांनी आणि विद्वानांनी जी जी अनुमाने काढली आहेत, त्यांचा परामर्श घेणे सर्वप्रथम आवश्यक आहे.

## भारतातील आर्थीक असमानतेबाबतचे अनुमाने :

राष्ट्रीय उत्पन्न वितरणाच्या विभिन्न अनुमानावरून स्पष्ट होते की, भारतात नियोजनबध्द पध्दतीने विकासास सुरूवात झाल्यानंतरही उत्पन्न व संपत्तीची असमानता कायम आहे. उत्पन्न वितरण व राहणीमानाचा स्तर या संदर्भात नियुक्त महालनोबीस समितीने भारतीय रिझर्व्ह बॅंक, अयंकार व मुखर्जी, नॅशनल काउंसिल ऑफ अप्लाईड एकॉनॉमिक रिसर्च (NCAER) यांनी काढलेल्या अनुमानाच्या आधारावर भारतातील उत्पन्न वितरणाच्या असमानतेबाबत पुढील प्रकारचे विचार व्यक्त केलेले आहेत.

भारतीय रिझर्व्ह बॅंकेने काढलेल्या अनुमानानुसार 1953–54 ते 1956–57 या काळात वरच्या स्तरातील 5 टक्के कुटूंबाना राष्ट्रीय उत्पन्नाच्या 20 टक्के भाग मिळाला होता तर खालच्या स्तरावरील 20 टक्के कुटूंबाना त्याचा केवळ 8 टक्के भाग प्राप्त झाला होता. यावरून उत्पन्न वितरणातील असमानता सहज स्पष्ट होते. इतके नव्हे तर ही असमानता ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेत शहरी क्षेत्रात जास्त प्रमाणात वाढली अयंगार व मुखर्जीच्या अनुमानावरून हे स्पष्ट होते की, खालच्या स्तरातील 20 टक्के व वरच्या स्तरातील 10 व 5 टक्के कुटूंबात ही असमानता बरीच जास्त आहे. 1960 मध्ये नॅशनल काऊंसिल ऑफ अप्लाईड एकॉनॉमिक रिसर्च (NCAER) या संस्थेने काढलेल्या अनुमानानुसार उच्च व निम्न वर्गातील अंतर बरेच वाढले आहे. कारण या काळात शहरी

क्षेत्रातील निम्न स्तरातील 20 टक्के कुटूंबांना राष्ट्रीय उत्पन्नाचा केवळ 4 टक्के भाग प्राप्त झाला होता तर उच्च स्तरातील 10 व 5 टक्के कुटूंबांना अनुक्रमे 42 व 31 टक्के भाग प्राप्त झाला होता. ग्रामिण भागात निम्न स्तरातील 20 टक्के कुटूंबांना मिळणारा वाटा पूर्वी इतकाच म्हणजे 4 टक्के होता तर उच्च स्तरातील 10 टक्के कुटूंबांना राष्ट्रीय उत्पन्नाचा 33.6 टक्के भाग प्राप्त झाला होता. यावरून स्पष्ट होते की शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामिण क्षेत्रात आर्थीक असमानतेचे प्रमाणे कमी झाले आहे.

जागतिक अधिकोशाने भारतीय असमानतेबाबत 1975 – 76 ते 1983 – 84 काळात काढलेल्या अनुमानानुसार 1983 – 84 मध्ये उच्च स्तरातील 10 टक्के कुटूंबाना 1975 – 76 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचा 36.6 टक्के भाग प्राप्त झाला होता. तो पुढे कमी होवून 1983 – 84 मध्ये 26.7 टक्के इतका झाला. तर निम्न स्तरावरील 40 टक्के कुटूंबांना मिळणारा भाग 16.2 टक्क्यावरून 20.4 टक्कयापर्यंत वाढला. याचा अर्थ असा होतो की, 1975 – 76 ते 1983 – 84 या काळात भारतीय उत्पन्न वितरणातील उसमानता थोडी कमी झाली आहे. असे असले तरी ही असमानता आजही कायम आहे. त्यामुळेच श्रीमंत अधिकाअधीक श्रीमंत तर गरीब अधिकाअधिक गरीब होत आहेत.

**भारतातील आर्थिक असमानतेची कारणे:**

भारतात आथिक असमानता अस्तित्वात असण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

1) गरिबी: व्यापक गरीबी हे भारतीतील उत्पन्न व संपत्तीच्या समानतेचे एक मुख्य कारण आहे. गरीबीमुळे एका बाजुला बहुसंख्य जनता भुख, बिमारी व कुपोशणाने ग्रस्त आहे. तर त्याच वेळेस दुसऱ्या बाजुला श्रीमंत वर्ग या सर्व आपतीपासुन मुक्त आहेत.

2) अपुर्ण विकास : महालोबीस समितीच्या अनुसार भारतीय लोकांच्या निम्न उत्पन्न पातळीचे एक कारण म्हणजे विकासाचा दर कमी असणे होय. 1951 ते 60 मध्ये स्थिर किंमतीच्या आधारावर विकासाचा दर 3.8 टक्के होता. तो 1969 –70 मध्ये 3.7 टक्के, 1971–78 मध्ये 3.4, 1978 – 81 मध्ये 2.5 टक्के व 1981 – 90 मध्ये 5 टक्के इतका होता विकासाच्या दराच्या निम्न स्तरामुळे भारतीय लोकांचे उत्पन्नही निम्न आहे.

3) आर्थीक शक्तीने केंद्रीकरण: उत्पन्न व संपत्तीच्या विषम वितरणामुळे भारतात काही मोजक्या लोकांकडे आर्थीक संपत्तीचे केंद्रीकरण झालेले आहे. तर दुसऱ्या बाजुला बहुसंख्या लोकांकडे या बाबीचा अभाव आहे. त्यामुळे श्रीमंत अधिकाअधिक श्रीमंत व गरीब अधिकाअधिक गरीब होत गेलेला आहे.

4) करचुकवेपणाः महालनोबीस समितीने करचुकवेपणा हे भारतातील उत्पन्न व संपत्तीच्या वितरणाच्या असामानतेचे एक कारण मानले आहे. त्यांच्या मतानुसार भारतात उच्च व मध्यम वर्गातील लोक करापासून स्वतःचा बचाव करण्याकरिता करचुकवेपणा करतात. ज्यामुळे काळया पैश्याच्या निर्मितीला प्रोत्साहन मिळून या व्यक्तींकडे मोठया प्रमाणात संपत्तीचा संग्रह झालेला आहे. तर दुसऱ्या बाजुला गरीब वर्ग यापासून अलिप्त आहे. त्यामुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील आर्थिक असमानता वाढत आहे.

5) उत्पादक साधनांचे असमान वितरणेः उत्पादक साधनांच्या असमान वितरणामुळेही उत्पन्न व संपत्तीची असमानता निर्माण होते. भारतात भूमी हे उत्पादनाचे एक प्रमुख साधन आहे. कारण 80 टक्के लोक जे ग्रामिण भागात राहतात ते कोणत्या ना कोणत्या रूपाने भूमीवर निर्भर आहेत. परंतु भारतातील वितरणातील विषमता लक्षात घेता 20 टक्के लोकांजवळ भूमी उपलब्ध नाही. तसेच ज्यांचेजवळ भूमी उपलब्ध आहे ती ही लाभदायक नाही. त्यामुळे भूमीहीन गरीब बनले आहेत. तर भूमीधारक श्रीमंत होत आहेत.

उत्पादनाचे दुसरे साधन आहे ते म्हणजे भांडवन हाये. परंतु भारतातील व्यापक दारिद्रयात लक्षात घेता हे साधनही अपुरे आहे. ज्यांचेजवळ भांडवल आहे ते अधिक श्रीमंत आर्थिक असमानता निर्माण झाली आहे.

6) भांडवल प्रधान तंत्राचा वापर : हे सुध्दा भारतीय आर्थिक असमानता वाढविण्याचे एक कारण आहे. भांडवलाचा अभाव व श्रमाची मुबलकता असणाऱ्या भारतासारख्या देशात केवळ खाजगी उद्योगच नव्हे तर सार्वजनिक उद्योगातही भांडवलप्रधान तंत्राचा वापर करीत आहे. त्यामुळे काही लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तर त्याचवेळेस बहुसंख्य लोक बेकार आहेत. अशाचप्रकारे ग्रामिण आणि शहरी क्षेत्रात भांडवल प्रधान तंत्राच्या वापरामुळे काही मोजक्या लोकांच्या हातात उत्पन्न व संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे. तर दुसऱ्या बाजुला बहुसंख्य लोकांकडे याचा अभाव आहे. त्यामुळे आर्थिक असमातनता निर्माण झाली आहे.

7) वाढती बेकारी : नियोजनाचा बराज काळ लोटूनही भारतात आजही बेकारी अस्तित्वात आहे शिवाय ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे गरीब अधिकाअधिक गरीब बनले आहे.

8) निम्न उत्पादकताः श्रमाची निम्न उत्पादकता हे सुध्दा भारतातील उत्पन्नातील असमानता वाढविण्याचे कारण आहे. निम्न उत्पादकता असणाऱ्या व्यक्तींचे उत्पन्न नेहमी कमी राहते. त्यामुळे ते गरीब राहतात. तर श्रीमंत वर्ग अधिक उत्पन्न राहिल्याने श्रीमंत राहतात. त्यामुळे गरीब व श्रीमंत हयांच्यातील अंतर वाढत जाते.

9) वाढती लोकसंख्या : 19951 ते 1991 या काळात भारतीय लोकसंख्येत तीव्र गतीने वाढझाली आहे. त्यामुळे आर्थिक असमानता वाढली आहे. या 40 वर्षाच्या काळात भारताची लोकसंख्या प्रतिवर्षी 2.2 टक्क्याने वाढली आहे. ही वाढ प्रामुख्याने निम्न, मध्यम व गरीब वर्गात झालेली आहे. या वर्गातील त्यांचे उत्पन्न अधिकच कमी झाले आहे. आणि ते दारिद्रय रेषेखाली गेलेले आहेत. ग्रामिण भागात वाढत्या लोकसंख्येचा जास्त प्रभाव कमी शेतजमिन असणाऱ्या कुटूंबावर पडला आहे. तर मोठी शेतजमिन असणाऱ्यांवर त्याचा जास्त प्रभाव पडलेला नाही. कारण कमी शेतजमिन असणाऱ्या कुटूंबातीलच सदस्य संख्या वाढली आहे. त्यामुळे मोठे शेतमालक अधिकाअधिक श्रीमंत होत गेले आहेत. तर छोटे शेतमालक अधिकाअधिक गरीब होत गेले आहेत.

10) वाढत्या किंमती : दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर भारतात वस्तुंच्या किंमती सातत्याने वाढत आहे. त्यामानाने मध्यम वर्ग, कामकरी वर्ग, भूमीहीन शेतमजूर, अल्पभूधारक इ. वर्गाचे उत्पन्न वाढले नाही. त्यामुळे ते गरीबीत जीवन जगत आहेत तर दुसऱ्या बाजुला मोठे भूमीधारक व्यापारी, सट्टेबाज, काळेबाजारी, उद्योगपती यांचे उत्पन्न यांचे उत्पन्न वाढले आहे. त्यामुळे आर्थिक असमानता निर्माण झाली आहे.

**आर्थिक असमानता दूर करण्यासाठी उपाययोजनाः**

1) भूमी सुधारणा कार्यक्रमाची अमलबजावणी : भारतातील बहुसंख्य जनता ग्रामिण भागात राहात असल्याने त्यांच्यातील आर्थिक असमानता दूर करण्यासाठी भूमी सुधारणा कार्यक्रमांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. याकरिता किमाान जमिन धारणा मर्यादा कायद्यांच्या अंतर्गत अतिरिक्त ठरलेल्या जमिनीचे भूमिहीने शेतमजूर व अल्पभूधारक यांच्यात वाटत करावे. त्यांना जमीनमालक जमीनीपासून वंचित करणार नाही. यांची दखल घ्यावी. शिवाय अशा लोकांना सरकारने स्वस्त दराने कर्ज, बि–बियाने, किटकनाशके इत्यादी उपलब्ध करून द्यावे. ज्यामुळे या लोकांचे उत्पन्न वाढेल व आर्थिक असमानता कमी होईल.

2) रोजगाराच्या अधिक सुविधा निर्माण करणे : उत्पन्न वितरणातील असमानता दूर करण्याकरीता ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात अधिक रोजगाराच्या सुविधा निर्माण करण्यात याव्यात. याकरीता कृषी आधारीत उद्योगांना त्यांच्या विकासाकरीता आवश्यक उपलब्ध वित्तीय व अन्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शिवाय सुशिक्षित बेकारी कमी करण्याकरीता श्रमप्रधान उद्योगांचा विकास केला जावा.

3) वेतन विषयक धोरण : उत्पन्न वितरणाच्या समानतेकरीता राष्ट्रीय स्तरावर संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगारांकरीता एकच वेतन धोरण असणे आवश्यक आहे. परंतु भारतात त्याचा अभाव आहे.

कारण सरकार संघटीत क्षेत्रातील कामगारांना महागाई नुसार वेतनात वाढ करीत आहे परंतु असंघटीत क्षेत्रात असे कोणतेही धोरण नाही. त्यामुळे या दोन क्षेत्रातल कामगारांच्या उत्पन्ना असमानता निर्माण झाली आहे. ही असमानता दूर करण्याकरीता सरकारने किमान वेतन कायदा मंजूर केला आहे संघटीत व असंघटीत अशा दोन्ही क्षेत्रातील कामगारांना लागु पडतो. तरीपण या कायद्याचे पालन असंघटीत क्षेत्रात होत नाही. म्हणून सरकारने या क्षेत्रात हा कायदा प्रभावीपणे राबविला पाहिजे. असे झाल्यास संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या उत्पन्नातील असमानता कमी होण्यास मदत होईल.

4) किंमत विषयक धोरण : वाढत्या किंमतीमुळे एका बाजुला सर्वसामान्य जनतेचे उत्पन्न कमी होत आहे तर दुसऱ्या बाजुला उत्पादक व वितरकांचे उत्पन्न वाढत आहे. ही असमानता दूर करण्याकरीता स्थिर किंमत विषयक धोरण राबविणे आवश्यक आहे. परंतु विकसनशील देशात किंमतीविषयक धोरण राबविण्यास सुरूवात केली आहे. याच्या अंतर्गत एका बाजुला वाढल्या किंमती बरोबर कामगारांच्या वेतनात व महागाई भत्त्यात वाढ केली आहे तर दुसऱ्या बाजुला सर्वसामन्य गरीब जनतेला सार्वजनिक वितरण प्रणालीच्या अंतर्गत मापक दराने जीवनावश्यक वस्तु उपलब्ध करून दिलेल्या आहेत. सरकारच्या या धोरणामुळे आर्थिक असमानता काही अंशी कमी होण्यास मदत झाली आहे.

5) सामाजिक सुरक्षिततेच्या सुविधा : जीवन विमा, पेंशन, भविष्य निधी, ग्रॅच्युईटी यासारख्या सामाजिक सुविधा उत्पन्न वितरणातील असमानता कमी करण्यास सहाय्यभूत ठरताता. म्हणून सरकारने या सुविधा केवळ संघटीत क्षेत्रातच नव्हे तर असंघटीत क्षेत्रातही जसे – पिक विमा, आयुर्विमा, इ. उपलब्ध करून देण्यास सुरूवात केलेली आहे.

6) लोकसंख्या नियंत्रण : उत्पन्नातील असमानता दूर करायची असेल तर मोठ्या कुटूंबाचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. त्याकरीता वाढत्या लोकसंख्येचे कुटूंब नियोजन कार्यक्रम राबवून नियंत्रण केले पाहिजे. सरकारने 1952 पासून कुटूंब नियोजन कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर राबविण्यास सुरूवात केली आहे असे असले तरी या कार्यक्रमाला अपेक्षित यश मिळू शकले नाही. म्हणून या जनतेचा फारसा प्रतिसाद न मिळाल्याने यशस्वी होवू शकला नाही. म्हणून सरकारने जनतेला कुटूंब नियोजनास प्रोत्साहित करण्याचे दृष्टीने प्रयत्न करावेत.

7) श्रमप्रधान तंत्राचा वापर : प्रचंड अशा श्रमशक्तीला रोजगार देवून त्यांच्या उत्पन्ना वाढ करण्याकरीता व त्यातुन आर्थिक असमानता दूर करण्याकरीता उत्पादनात श्रमप्रधान तंत्राचा मोठ्या प्रमाणावर वापर केला पाहिजे. यादृष्टीने सरकारने पुढाकार घेवून अनेक योजना सुरू केलेल्या आहे.

लघू व कूटीर उद्योग श्रमप्रधान असल्याने सरकार त्यांना म्हणूनच  आर्थिक व अन्य प्रकारची मदत पुरवित आहे.

8) करारोपण : प्रगतीशील करारोपण आर्थिक असमानता कमी करण्याचा एक उत्तम उपाय आहे. परंतु भारतात ही कर पद्धती अंमलात आणुनही आर्थिक असमानता व संपत्तीचे केंद्रीकरण थांबु शकले नाही. याचे कारण म्हणजे करचुकवेपण होय. म्हणून सरकारने अशा कर चुकविणाऱ्या व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच काळे धन बाहेर काढण्याकरीता काही योजना राबवाव्यात. असे झाल्यास निश्चित आर्थिक असमानता कमी होण्यास मदत होईल.

9) एकाधिकार  व प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहाराचे नियंत्रण : आर्थिक असमानता कमी करण्यासाठी एकाधिकाराचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. यादृष्टीने सरकारने 1969 पासुन एकाधिकार व प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहार अधिनियम मंजूर करून ती राबविण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे उद्योग घराण्यांकडे होणाऱ्या संपत्तीच्या केंद्रीकरणाला आळा बसला आहे.

10) मागासलेल्या क्षेत्रांच्या विकास : लोकांची उत्पन्नाची पातळी वाढविण्याकरीता आणि उत्पन्न व संपत्तीतीला असमानता दूर करण्याकरीता मागासलेल्या क्षेत्रांचा कृषीगत व औद्योगिक विकास करण्याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. कृषीची उत्पादकता वाढविण्याकरीताा शेतकऱ्यांना यंत्रे, अवजारे, सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. नवीन उद्योग स्थापण्याकरीता उद्योजकांना करात सुट व अन्य प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. रस्ते, धरणे, विज व अन्य आधारभूत सुविधांचा विकास करण्यात यावा जेणेकरून अधिक रोजगार निर्माण होईल. अशाप्रकारे मागासलेल्या क्षेत्रांचा विकास झाल्यास कृषी व उद्योगाची उत्पादकता वाढेल आणि लोकांच्या हातात होणारे आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण थांबेल.

**संदर्भ –**

''भारतीय अर्थव्यवस्था''– डालचंद्र बागडी (अर्जुन पब्लिशींग हाऊस – दिल्ली)

''भारतीय अर्थव्यवस्था''– मिश्र, पुरी (हिमालया पब्लिशींग हाऊस – मुंबई)

''भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास'' –    डॉ. महाजन (निराली प्रकाशन, पूणे)

''भारतीय अर्थव्यवस्था विकास  आणि पर्यावरणात्मक अर्थशास्त्र – डॉ. जे. एम. काकडे, प्रा. एस.पी. वासेकर (पायल प्रकाशन, नागपूर)

''भारतीय अर्थव्यवस्था'' – डॉ. देसाई, डॉ. भालेराव (निराली प्रकाशन, पूणे)

''स्पर्धा परिक्षा संपूर्ण अर्थशास्त्र'' – डॉ. किरण देसले (दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव)